इस्रायलच्या परराष्ट्र मंत्र्यांची भारत भेट (04 नोव्हेंबर 2025)

04 नोव्हेंबर 2025

इस्रायलचे महामहिम परराष्ट्रमंत्री श्री. गिदोन सार हे दोन दिवसांच्या भारत भेटीवर होते. परराष्ट्र मंत्री म्हणून भारताची ही त्यांची पहिली भेट होती.

2. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस.जयशंकर आणि परराष्ट्र मंत्री गिदोन सार यांची नवी दिल्ली येथे भेट पार पडली. भारत-इस्त्रायलच्या धोरणात्मक भागीदारीच्या संपूर्ण विस्ताराने उभय मंत्र्यांनी तपशिलाने आढावा घेतला. उभय मंत्र्यांनी राजकीय, सुरक्षा, शेती, व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण आणि नागरिक परस्पर संबंध तसेच महत्त्वाच्या आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, अर्धवाहक, सायबर सुरक्षा आणि एआय यासारख्या क्षेत्रांमध्ये सुरू असलेल्या सहकार्यात्मक कार्याचा आढावा घेतला.

3. दहशतवादाच्या सामायिक आव्हानावर उभय मंत्र्यांनी दहशतवादाच्या सर्व प्रकारांत आणि अभिव्यक्तीत शून्य-सहिष्णुतेचा जागतिक दृष्टिकोन सुनिश्चित करण्याचा पुनरुच्चार केला.

4. पश्चिम आशिया आणि आखातातील घडामोडींबद्दल परराष्ट्र मंत्री सार यांनी इस्रायलचा दृष्टिकोन आणि मते मांडली. परराष्ट्र मंत्र्यांनी गाझा शांतता योजनेला भारताचा पाठिंबा व्यक्त केला. ओलिसांच्या परतीचे स्वागत केले. शांतता योजना शाश्वत आणि चिरस्थायी तोडगा काढण्यासाठी मार्ग प्रशस्त करेल अशी आशा व्यक्त केली.

5. उभय मंत्र्यांनी अन्य जागतिक घडामोडी आणि बहुपक्षीय मंचांमध्ये सहकार्य विस्तारावर चर्चा केली. सुषमा स्वराज विदेशी सेवा संस्था आणि इस्रायलच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालय यांदरम्यान प्रशिक्षणाबाबत सामंजस्य कराराचे आदानप्रदान परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि परराष्ट्रमंत्री सार यांच्या साक्षीने पार पडले.

6. भेटीदरम्यान, परराष्ट्र मंत्री सार यांनी भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची भेट घेतली आणि हैफा चौक स्मारकालाही भेट दिली.

**नवी दिल्ली**

04 नोव्हेंबर 2025